# जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १७१** **दिनांक २६/०६/२०२१**

## वालीव पोलीस स्टेशनच्या हद्दित सापडला अनोळखी पुरूषाचा मृतदेह.

दि.२३/०६/२०२१ रोजीचे ११:३० वा. पुर्वी वालिव पोलीस स्टेशनच्या हद्दिमध्ये मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्रं. ८ ची मुंबई वाहिनीवरील मौजे. पेल्हार गावचे हद्दीतील रशिद कंम्पाऊड समोर, सर्विस रोड लगत असलेल्या गवतामध्ये नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह मिळून आला असून सदर अनोळखी पुरूषाचे अंदाजे वय-४५ ते ५० वर्षे, रंग-सावळा, उंची-०५ फुट ०६ इंच, डोक्याचे केस-काळे व सफेद रंगाचे कलर केलेले. २ ते ३ इंच लांबीचे केस, डोळे- बंद स्थितीत, डावे डोळयाची पापणीची त्वचा सफेद झालेली, नाक- नाकाचे डावे बाजुची त्वचा सफेद झालेली, कान- मोठे, त्यामध्ये डावे कानाचे पाळीमध्ये सफेद बुरशी आलेली व लालसर द्रव आलेले, मिशी-वाढलेली, दाढी-खालच्या ओठाचे खाली दाढी वाढलेली, चेहरा-उभट, अंगाने-मजबुत, अंगात-सफेद रंगाचे हाफ बनियान, नेसुस-काळया रंगाची हाफ बरमुडा पँट, उजवे हाताचे मनगटावर-लाल, केसरी, काळा रंगाचा धागा बांधलेला, अशा वर्णनाच्या अनोळखी पुरूषास कोणीतरी अज्ञात आरोपीने कोणत्या तरी अज्ञात कारणावरून मारहाण करुन त्यास जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यास मौजे पेल्हार गावाचे हद्दीमध्ये गवतात टाकुन देवुन निघुन गेला अशा फिर्यादीवरून वालिव पोलीस स्टेशन येथे गुरनं ५९४/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३०२,२०१ प्रमाणे दि.२५/०६/२०२१ चे २०:३५ वा. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तरी नमूद गुन्हयातील अनोळखी मयत पुरूष व त्याचे वारसदार यांचा शोध लागणे गरजेचे असल्याने सदर इसमास कुणी ओळखत असल्यास पोलीस स्टेशनला माहिती देण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि. करांडे मो क्र ९२२२२३३८७६, ०२५०-२४५४४०० हे करीत आहे.



